# शीतल हिवराळे बनल्या गटविकास अधिकारी

देगलूर : येथील महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी शीतल गोविंदराव



हिवराळे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे आयोजित केलेल्या स्पर्धा परीक्षेमध्ये आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. त्यांची गटविकास अधिकारी या पदावर निवड झाली आहे. या यशाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश बेंबरेकर, शशिकांत चिद्रावार, नारायणराव मैलागिरे आदींनी स्वागत केले.